# मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव,
दुसरा मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे– ४०१ १०१.
दुरध्वनी क्र. ०२२ २८१४९०५२ Email :education@mbmc.gov.in

**जा.क्र.मनपा/शिक्षण/** 229 **/२०२४-२५** **दि.** 22/05 **/२०२४**

**प्रति,**
**मा. जनसंपर्क अधिकारी**
**जनसंपर्क कार्यालय**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**विषय:-** आर.टी.ई. 25 टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन 2024-25 ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत प्रेस नोट प्रकाशित करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाचे आर.टी.ई. 25 टक्के प्रवेशाकरीता ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत प्रेस नोट तयार केलेली आहे. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात प्रेस नोट विनामुल्य प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

**(सोनाली मातेकर)**
**शिक्षणाधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रेसनोट

**आरटीई प्रवेश प्रक्रिया 2024-25 बाबत**

सन 2024-25 या वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२(१)(सी) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने दि. 17/05/2024 पासून सुरु करण्यात आलेली आहे. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दि. 31/05/2024 असून पालकांनी मुदतीत अर्ज भरणे आवश्यक आहे.

इच्छुक अर्जदारानी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभागांच्या https://student.maharashtra.gov.in/adm_portal/Users/rte_index_new या वेबसाईटवर दिनांक 31/05/2024 रात्री 12.00 वाजेपर्यंत बालकांचे अर्ज ऑनलाईन भरावेत.

शैक्षणिक वर्ष 2024-25 प्रवेश प्रक्रिया जूनमध्ये सुरु होत असल्याने आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेस दिनांक 31/05/2024 नंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही.

तरी पालकांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, ऑनलाईन प्रवेश अर्ज मुदतीपूर्वी भरण्याची काळजी घ्यावी. असे आवाहन शिक्षणाधिकारी यांनी केले आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

CamScanner